विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७

ई-मेल आयडी क्र. dydpune@gmail.com. वेबसाइट www.dydepune.com


---

जाक्र/शिउस/पुवि/उमा/२०१६ दिनांक : ३०.११.२०१६

प्रति,

सर्व प्राचार्य,
कनिष्ठ महाविदयालय, पुणे व पिंपरी चिंचवड,
महानगरपालिका क्षेत्र.

विषय : वार्षिक क्रीडास्पर्धा आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या कामकाजाबाबत.

उपरोक्त विषयान्वये पुणे व पिंपरीचिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७मध्ये २४५ कनिष्ठ महाविदयालये कार्यरत आहेत. सदरच्या महाविदयालयामध्ये इ.११वी १२वी वर्गासाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे विदयार्थ्यांना अध्यापन होत आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक रा.म/परीक्षा-२/७४४५,पुणे दि. २१ नोव्हेंबर २०१३च्या परिपत्रकानूसार इ.११वी व १२वीच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यानूसार सन २०१४ पासून उच्च माध्यमिक इ.१२वीच्या आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाची नव्याने परीक्षा घेण्यात येत आहे. हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे. सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा अ विभागात प्रात्यक्षिकांसाठी २५ गुण व ब विभागात लेखी परीक्षेसाठी २५ गुण याप्रमाणे दोन्ही सत्रातील एकूण १०० गुणांचे रुपांतर ५० गुणांमध्ये करुन श्रेणी देण्यात येत आहे. संबंधित रेकॉर्ड कार्यालयात ठेवणे बंधनकारक आहे. त्यानूसार या विषयाचे संपूर्ण वार्षिक नियोजन, त्यासंदर्भात महाविदयालय स्तरावर विदयार्थ्यांसाठी काढलेलया सूचना, वेळापत्रक प्रत्यक्ष मैदानावरील उपक्रमाचे फोटो मूल्यांकनाच्या नोंदी इत्यादी सर्व माहितीचे रेकॉर्ड (किमान मागील तीन वर्षाचे) ठेवावे.

आपल्या कनिष्ठ महाविदयालयात नोव्हेंबर किंवा डिसेबर महिन्यात वार्षिक क्रीडा सप्ताह साजरा करण्यात यावा. वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन सन्माननीय अधिकारी पदाधिकारी अथवा क्रीडा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय नामवंत खेळाडू यांना निमंत्रित करावे. त्यांच्या शुभहस्ते क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करावे. क्रीडा सप्ताहामध्ये किमान तीन सांघिक खेळ व तीन वैयक्तिक खेळांचा समावेश असावा. क्रीडा सप्ताहामध्ये नैपुण्य मिळविणा-या विदयार्थी खेळाडूंना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बक्षीसे देण्यात यावीत. उपरोक्त उपक्रम आपल्या महाविदयालयात राबविले जाईल याची दक्षता घ्यावी.

**टीप : उपरोक्त बाबीसाठी गुरुवार १.१२.२०१६रोजी स.११.००वा. मॉडर्न कनिष्ठ महाविदयालय जंगली महाराज रोड,पुणे येथील सभागृहात क्रीडा शिक्षकांची बैठक आयोजित केलेली आहे. क्रीडा बैठकीस क्रीडाशिक्षकांने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. (सदरचे परिपत्रक शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे)**

MRaut 30.11.16

**( मीनाक्षी राऊत)**
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे